MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. I



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.R.D.Rathod
Dr.B.K.Shep
Dr.K.M.Bhange

46) वसंतराव नाईक यांचे कृषि विकासातील योगदान
प्रा.डॉ.जाधव सुनिल महादेवराव, पाटोदा ||123

47) कृषि क्रांतीचे जनक : वसंतराव नाईक
प्रा.डॉ.वंदन बा.जाधव, पाटोदा, जि.बीड ||124

48) भारताचा आदर्श भुमीपुत्र – मा. वसंतराव नाईक
प्रा. डॉ.घनशाम जगताप, नाशिक ||126

49) महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरणात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.संजय अंकुशराव जगताप, किनगाव ||127

50) महाराष्ट्राच्या कृषी विकासात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे योगदान
डॉ.इंगळे चत्रभुज वंकटराव. जि.बीड (महाराष्ट्र) ||129

51) हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक : जीवन आणि कार्ये
प्रा.गोदावरी व्ही. बन, जि. यवतमाळ ||131

52) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.मुंढे तुळशिराम विनायकराव, जि.बीड ||134

53) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे, नांदूरघाट ||136

54) महाराष्ट्राचा भाग्य विधाता – वसंतराव नाईक
प्रा. डॉ. मलवाडे व्ही.ए. & प्रा. नवगणकर राजाभाउ व्यंकटराव, जि.हिंगोली ||137

55) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक
प्रा.नाईक एन.डी.. ता.परळी-वै. जि.बीड ||139

56) हरीतक्रांतीचे प्रणेते – वसंतराव नाईक यांचे जीवन व कार्य
डॉ.विजय एच.नागरे, ता.सिंदखेड राजा जि.बुलढाणा ||140

57) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक:– एक जीवन प्रवास
प्रा.अजय श्रीधर फड, ता.अहमदपुर, जि.लातुर ||143

58) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक : जीवन आणि कार्य
प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ, जि. परभणी ||144

59) आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमधील वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा. दिनकर मोहनराव रणदिवे, ता.जि. लातूर ||146

60) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.डॉ. भारत भोपु राठोड, सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड ||149

61) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक: जीवन व कार्य
प्रा.डॉ.प्रे.म.राठोड. माजलगाव, जि.बीड (महाराष्ट्र) ||151



http://www.printingarea.blogspot.com

देशमुख यांच्या बरोबर वसंतरावांनी वकिलीची सुरवात केली.नंतर काही काळाताच पुसद येथे स्वतंत्रपणे वकिली व्यवसायाची सुरवात केली.वकिली व्यवसाय करताना त्यांनी दीन–दुबळ्या,गोर–गरिब लोकांना मदतीचा हात देऊन विविध अडचणी मधुन बाहेर काढण्याचे प्रयत्न केले.त्यात त्यांना खुप यश मिळाले. १९४३ ला ते पुसद कृषी मंडळाचे अध्यक्ष झाले. १९४६ ला त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि पुसद नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणुन निवडुन आले.मुंबई दुभाषिक राज्यातील मंत्रीमंडळात ते कृषीमंत्री बनले.येथुनच त्यांच्या व्यापक कार्याला सुरवात झाली. १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात ते महाराष्ट्राचे पहिले महसुलमंत्री झाले. १९६२ च्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कन्नमवारांच्या मृत्युनंतर वसंतराव मुख्यमंत्री बनले.या मुखमंत्री पदावर सर्वाधिक काळ म्हणजे बारा वर्षे राहण्याचे भाग्य त्यांना लाभले.या काळात त्यांनी महाराष्ट्रात अनेक विकास कामे केली. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणुन वसंतराव नाईक यांची एका तपाची कारकीर्द ही स्थैर्य आणि गतिमान विकासासाठी ओळखली जाते. १९६५ आणि १९७१ चे भारत– पाकिस्तान युद्धे,तीन मोठी दुष्काळ यांसारख्या समस्यांना तोंड देतानाच त्यांनी शेतीचा अमूलाग्र विकास करून महाराष्ट्र अन्न–धान्यांनी स्वयंपुर्ण बनवला. म्हणुनच वसंतराव नाईकांना महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे प्रणेते म्हणुन ओळखले जाते.कृषी विकासासाठी ते किती समर्पित होते ते यावरून समजेल की १९६५ मध्ये त्यांनी दोन वर्षात महाराष्ट्र धान्यांच्या बाबतीत स्वयंपुर्ण बनवला नाही तर मी फाशी जाईन अशी घोषणा केली.आज देशभरात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या नावाने ओळखली जाणारी योजना महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या धर्तीवरच राबवली जात आहे.त्यासाठीचे श्रेय काही प्रमाणात वसंतराव नाईक यांनाच द्यावे लागेल.वसंतरावांनी शेत जमिनी सिंचनाखाली आणण्यासाठी खुप योजना राबवल्या.मोठ्या प्रमाणात विहिरी,तलाव बांधण्यात आले. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे अभियान राबवण्यात आले. पशूपालन,कुक्कूटपालन यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले राज्यात कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आले.शेती मालास [illegible] किंमतीचे धोरण तयार केले गेले.

अशा प्रकारे वरिलसर्व कार्याद्वारे वसंतराव नाईकांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि विकासामध्ये अतुलनिय असे योगदान दिले.एक यशस्वी मुख्यमंत्री आणि जनतेचा नेता म्हणुन वसंतराव नाईक सदैव स्मरणात राहतीलच.

**संदर्भ:–**

१) गोर वसंतरावजी नाईक – रवी राठोड
२) लोकसत्ता अग्रलेख २ जुलै २०१३
३) विकीपिडीया

**58**

# हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक : जीवन आणि कार्य

**प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गंगाखेड, जि. परभणी

**********

**प्रस्तावना :–**

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दिशा दिली ती वसंतराव नाईकांनी. महाराष्ट्रात म्हणावे तसे उदयोग भरभराटीला आले नव्हते. राज्यात उदयोगधंदे वाढले पाहिजेत, परंतू शेतकरी आणि शेती टिकली पाहिजे या मताचे वसंतराव नाईक होते. भारतातील बहूसंख्य समाज हा शेतीवर अवलंबून आहे. शेती टिकली तर देश टिकेल असे ते म्हणायचे. शेतीला उदयोगाचा दर्जा मिळावा असे त्यांना वाटायचे.

एकीकडे समाजाला सुशिक्षित करणे, दुसरीकडे सत्तेचा उपयोग करून शेतकऱ्यांना आधुनिक शेती करायला लावणेयासाठीच वसंतराव नाईक यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी महाराष्ट्राला आधुनिक विज्ञानाची व शेतीतंत्राची ओळख करून दिली. वसंतराव नाईक हे शेतीवर प्रचंड प्रेम करणारे शेतकरी होते. समाजाला तळातील घटकापर्यंत शिक्षणाची पहाट उगवली पाहिजे, अशी धारणा उराशी बाळगून त्यासाठी झटणारे कार्यकर्ते होते.

राज्याच्या हिताची प्रचंड जपणूक करणारा सर्वसामान्यांशी बांधिलकी मानणारा आणि राज्याच्या हिताची प्रचंड जपणूक करणारा हा नेता होता. शत्रूला आपल्या प्रेमळ स्वभावाने जिंकणारा व विरोधी पक्षाला मानसन्मान देणारा विलक्षण राजकारणी होता.

एक दिलदार मित्र, मनस्वी नेता व समाजसेवक अशीच त्यांची ओळख बनली आहे. सतत साडेअकरा वर्षे महाराष्ट्रासारख्या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून अंत्यत प्रभावीपणे काम करणे ही गोष्ट साधी नाही.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :–**

१. स्व. वसंतराव नाईक यांचा जीवन परीचय अभ्यासणे.
२. स्व. वसंतराव नाईक यांचे कार्य अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोधनिबंधात दुयम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, इंटरनेटवरील माहिती, विकिपीडीया इत्यादी साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

**स्व. वसंतराव नाईक यांचा जीवन परीचय :–**

Indexed

IMPACT FACTOR 6.029 iijif

Cosmos IMPACT FACTOR 5.234


***Publisher & Owner***

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126

**(Maharashtra) Mob.09850203295**

E-mail: vidyawarta@gmail.com

**www.vidyawarta.com**

**ISSN-2319 9318**